**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यार्थ्यांनो ! स्पर्धा परीक्षेसाठी कसून सराव करा - कुलगुरु
## विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे कुलगुरुंच्या हस्ते उद्‌घाटन

अमरावती.

स्पर्धा परीक्षा महत्वाची असून या परीक्षेच्या उत्तम तयारीसाठी सर्व विद्यार्थ्यांनी कसून सराव करुन स्पर्धा परीक्षेमध्ये अव्वल येण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. आदिवासी संशोधन प्रशिक्षण, पुणे यांचेकडून प्राप्त अनुदानामधून विद्यापीठात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (यु.पी.एस.सी.) सुरु करण्यात आले असून त्या केंद्रांतर्गत सुरु झालेल्या वर्गाचे उद्‌घाटन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्राचे समन्वयक प्रा. अशोक राठोड व सहसमन्वयक प्रा.एस.एस. सेन उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने विविध शासकीय विभागात नुकत्याच मोठ्या प्रमाणावर जागा भरण्याबाबत निर्णय घेतला असून त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना रोजगार मिळणार आहे. याप्रसंगी कुलगुरु मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले, स्पर्धा परीक्षेसाठी सर्वांगीण अभ्यास महत्वाचा असतो. दैनंदिन घटनांचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज असून जास्तीतजास्त तास अभ्यास केल्यास विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये अव्वल येवू शकतो. अव्वल येण्याचा ध्यास, जिद्द व सातत्य विद्यार्थ्यांनी ठेवून सकारात्मक स्वप्न पाहावी आणि विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे उपलब्ध झालेल्या संधीचे सोने करावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना केले. स्पर्धा परीक्षेची तयारी कशाप्रकारे करावी, याविषयी मार्गदर्शन करुन त्यांनी स्वतःच्या जीवनातील अनुभव विद्यार्थ्यांना सांगून भावी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

सुरुवातीला कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शब्दसूमनाने स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकतेतून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. अशोक राठोड यांनी केंद्राची उपयुक्तता व उपलब्धी याविषयी माहिती दिली. संचालन करीत आभार सहसमन्वयक प्रा.एस.एस. सेन यांनी मानले. यावेळी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०९/०७/२०१८.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी